## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की :

माझे नाव : अभिषेक देवीदास कवडे
माझे वय : ३० वर्षे,
व्यवसाय : शेती,
राहणार : मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.

## सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती. एस. आर. पाचारणे यांचे मार्फत

१. मी संजय बाळू बनकर याला ओळखतो कारण की रेल्वे भरतीसाठी मी त्याला पैसे दिले होते. या प्रकरणातील घटना दहा वर्षापूर्वी घडली होती. कळंबचे रामकर यांनी माझी ओळख संजय बनकर याच्याशी करून दिली होती. रामकर यांनी मला रेल्वे भरतीसाठी दीड लाख रूपये सिमा मोहितकर मॅडम यांच्याकडे भरावे लागतील असे मला सांगितले होते. त्यानंतर मी माझे वडील, रामकर आणि बनकर असे सगळे मिळून खासगी वाहनाने मुंबईला गेलो होतो. मुंबईला खासगी वाहनाने जात असताना आम्ही चारचाकी वाहनातच संजय बनकर याला दीड लाख रूपये रोख रक्कम दिली होती. मुंबई येथे पोहचल्यानंतर आम्ही सगळे सिमा मोहितकर मॅडम याच्या घरी गेलो. तिथे संजय बनकर यांनी आमचेसमक्ष दीड लाख रूपये रोख रक्कम सिमा मोहितकरला दिली. पैसे घेतल्याचे सिमा मोहितकर यांनी स्टॅम्प पेपरवर लिहुन दिले. सिमा मोहितकर यांनी आम्हांला एक दीड महिन्यात काम होईल असे सांगितले होते. आता मला स्टॅम्प पेपरची छायांकित प्रत दाखविण्यात आली. ते सिमा मोहितकर मॅडम याच्या हस्ताक्षरात आहे. माझेकडून सिमा मोहितकर यांना पैसे मिळाल्याचे स्टॅम्प पेपरमध्ये नमूद आहे. आरोपीच्या वकिलांची सदर स्टॅम्प पेपरला वस्तूचिन्ह देण्यास हरकत नसल्यामुळे सदर स्टॅम्प पेपरला **वस्तूचिन्ह अ** देण्यात येते.

२. तीन ते चार महिन्यानंतर आम्ही परत सिमा मोहितकर यांच्या रूमवर गेलो परंतु आम्हांला सिमा मोहितकर मिळून आल्या नाही. सिमा मोहितकर हिने आमच्याकडून पैसे घेवून सुध्दा आम्हांला रेल्वे मध्ये नोकरी लावून न दिल्यामुळे आमची फसवणुक केली. आरोपीला मी ओळखतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

## उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. व्ही. एन. चासकर यांचे मार्फत.

**३.** माझे शिक्षण बाराव्या वर्गापर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की मी माझे जबाब देण्यासाठी पोलिस स्टेशनला गेलो होतो. मी माझा जबाब वाचून बघितला होता व तो माझे म्हणण्याप्रमाणे बरोबर होता. पोलिसांना जबाब देताना मी रामकर, बनकर व माझे वडील खासगी वाहनाने मुंबईला गेलो होतो ही बाब मी पोलिसांना सांगितली होती. माझे जबाबामध्ये रामकर यांचे नाव का नमूद नाही याचे कोणतेही कारण मला सांगता येणार नाही. मुंबईला आम्ही खासगी चारचाकी वाहनाने गेलो व मुंबईला जात असताना खासगी वाहनात आम्ही बनकर याला दीड लाखरूपये रक्कम रोख दिली हे मी पोलिसांना जबाब देताना सांगितले होते. सदरची बाब माझे जबाबात का नमूद नाही याचे कोणतेही कारण मला सांगता येणार नाही. सिमा मोहितकर हिने पैसे स्विकारल्यानंतर एक ते दीड महिन्यात काम होईल हे मी पोलिसांना जबाब देताना सांगितले हाते. सदरची बाब माझे जबाबात का नमूद नाही याचे कोणतेही कारण मला सांगता येणार नाही.

**४.** माझे घरी माझे आईवडील, बहिण आणि भाचा असतो. माझे वडील एस.टी.बसचालक म्हणून सेवानिवृत्त झालेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की शशिकांत रामकर हे एकाच गावात व जवळ राहणारे आहेत. हे म्हणणे खरे आहे की शशिकांत रामकर हे रेल्वे मध्ये नोकरी लावून देण्यासाठी सिमा मोहितकरचे एजंन्ट म्हणून काम करीत होते. हे म्हणणे खरे आहे की शशिकांत रामकर हेच माझे घरी रेल्वेच्या भरतीसाठी पहिल्यांदा माझे वडीलांना सांगण्यासाठी आले होते. शशिकांत रामकर हे पाचदा माझे घरी माझे वडीलांना रेल्वेच्या भरतीसाठी सांगण्याकरीता आले होते. हे म्हणणे खरे आहे की रेल्वेमध्ये खलाशी आणि लिपीक पदावर पैसे देवून भरती केले जात आहे हे सर्वप्रथम मला शशिकांत रामकर यांनी सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की शशिकांत रामकर यांनी सर्वप्रथम सिमा मोहितकर ही रेल्वेमध्ये नोकरी लावून देते असे सांगितले हाते. साक्षीदार सवतहुन सांगाते की बनकर याने सुध्दा त्यानंतर मोहितकर ही नोकरी लावून देत असल्याचे आम्हांला सांगितले होते.

**५.** हे म्हणणे खरे आहे की लिपीक पदासाठी आणि खलाशी पदासाठी दीड लाख रूपये व सव्वा लाख रूपये लागतात हे आम्हांला सर्वप्रथम शशिकांत रामकर यांनी सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की पैसे दिल्यानंतर काम होईल असे मला शशिकांत रामकर यांनी सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की पैसे दिलयानंतर कामाची खात्री आहे हे शशिकांत रामकर यांनीच सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की त्यांच्या मुलाचे व पुतण्याचे सिमा मोहितकर हिच्याकडे पैसे भरल्याची बाब शशिकांत रामकर यांनी मला सांगितली होती. हे म्हणणे खरे आहे की पैसे दिल्यानंतर सिमा मोहितकर ही स्टॅम्प पेपरवर लिहुन देते व कामाची खात्री देते असेसुध्दा शशिकांत रामकर यांनी मला सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे

की या भरतीबाबत शिक्षणाची पात्रता किती आहे हे सुध्दा मला शशिकांत रामकर यांनी सांगितले हाते. हे म्हणणे खरे नाही की सध्या तेथे चारच जागा शिल्लक आहेत हे शशिकांत रामकर यांनी मला सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की मी माझे मुलाचे पैसे भरले तुम्ही पण तुमच्या मुलाचे पैसे भरा असे शशिकांत रामकर यांनी माझे वडिलांना सांगितले होते.

६. हे म्हणणे खरे आहे की दिनांक २९.०५.२०१० रोजी मी सिमा मोहितकर हिला पैसे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की सिमा मोहितकर हिला पैसे देण्यापूर्वी माझी संजय बनकरशी ओळख नव्हती. हे म्हणणे खरे आहे की आमचा पूर्ण विश्वास गावचा माणूस व जवळचा माणूस म्हणून शशिकांत रामकरवर होता. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळेस मी पैसे भरले त्यावेळेस मी सत्यम कॉम्प्युटर मंचर येथे डिल्मोपा करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की रेल्वे भरती हे खाते केंद्र सरकारच्या अख्त्यारित आहे. हे म्हणणे खरे आहे की रेल्वे भरती ही सरकारी भरती असते. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळैस रेल्वे भरती निघते त्यावेळेस पेपरमध्ये किंवा ऑनलाईन त्याची जाहिरात येते. हे म्हणणे खरे आहे की रेल्वे भरती ही स्पर्धापरीक्षा मार्फत होते. हे म्हणणे खरे आहे की रेल्वे भरतीसंदर्भात मी ऑनलाईन अर्ज केला नव्हता व रेल्वे भरती मध्ये लेखी व तोंडी परिक्षा दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की रामकर यांनी ज्यावेळेस आम्हांला सांगितले होते त्यावेळेस रेल्वे भरतीची जाहिरात निघाली होती. हे म्हणणे खरे आहे की मी रेल्वे भरतीचा फॉर्म सुध्दा भरला नव्हता.

७. हे म्हणणे खरे आहे की ज्या माणसाला आपण पैसे देतो तोच माणूस आपल्याला लिहुन देतो. हे म्हणणे खरे आहे की ज्या माणसाला आपण पैसे देतो तोच माणूस पैसे परत करण्यासाठी चेक देतो. दिनांक २९ तारखेला सिमा मोहितकर हिला पैसे देईपर्यंत मी संजय बनकर याची चौकशी केली नव्हती. मुंबईला जावून सिमा मोहितकर ही रेल्वेची भरती करते की काय याबाबत मी चौकशी केली नव्हती. सिमा मोहितकर ही रेल्वेमध्ये कामाला आहे की काय याबाबत मी चौकशी केली नव्हती. सिमा मोहितकर हिची कोणत्याही प्रकारे चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मला रामकर याने सांगितल्यामुळेच रामकर याच्यावर विश्वास ठेवून सिमा मोहितकर हिला पैसे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की स्टॅम्प पेपर सिमा मोहितकर हिनेच आणला होता व तिनेच लिहुन दिला होता. हे म्हणणे खरे नाही की रामकर याच्यावर संपूर्ण विश्वास असल्यानेच मी मोहितकर यांना पैसे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की शशिकांत रामकर यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवून मी सिमा मोहितकर हिला पैसे दिले होते. ज्या खासगी गाडीने आम्ही मुंबईला गेलो होतो त्या खासगी गाडीचा नोंदणीकृत क्रमांक व त्या गाडीच्या चालकाचे नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की ज्यादिवशी आम्ही सिमा मोहितकरला पैसे दिले होते त्याच दिवशी आम्ही पहिल्यांदा सिमा मोहितकर हिच्या घरी गेलो होतो.

८. हे म्हणणे खरे नाही की सिमा मोहितकर हिच्याकडे पैसे मागण्यासाठी शशिकांत रामकरच गेला होता. शशिकांत रामकर यालाच सिमा मोहितकर हिने चेक दिला होता की काय याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आणि रामकर एकाच गावचे असल्यामुळे व रामकर हा एजन्ट असल्यामुळे त्यांच्या सांगण्यानुसारच मी आज मी माझे साक्षीमध्ये आरोपीचे नाव घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की गाडीमध्येच मी आरोपीला पैसे दिले होते हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की शशिकांत रामकर याला वाचविण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपी हा कधीही आमच्याबरोबर कुठेही आला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक : २२/०१/२०२० (एन. डी. मेश्राम)
घोडेगाव प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव